MHRG160002022019	खटला दाखल तारीख	:	११.०९.२०१९
	खटला नोंदणी तारीख	:	११.०९.२०१९
	खटला निकाल तारीख	:	२१.०७.२०२६
	कालावधी	:	वर्ष महिने दिवस
			०६ १० १०

मे. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पाली–सुधागड यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्री.रा.अ.शिवरात्री)

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.८९/२०१९. निशाणी क्र.६०/ब

फिर्यादी	::	**हितेश ज्वेलर्स तर्फे हितेश सरजमल राठोड,** वय–४२ वर्षे, व्यवसाय– व्यापार, रा.पाली, ता.सुधागड, जि.रायगड.
प्रतिनिधीत्व	::	**फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री. नितीन शेवाळे,**
आरोपी	::	**रिना संतोष गुजर,** वय–५० वर्षे, व्यवसाय–गृहीणी, रा.भिरा, ता. माणगाव, जि.रायगड.
प्रतिनिधीत्व	::	**आरोपीतर्फे विधीज्ञा अक्षरा देशमुख,**

:: न्या य नि र्ण य ::

(दिनांक २१/०७/२०२६ रोजी पारीत)

आरोपी विरुध्द प्रस्तुतचा खटला पराक्रम्य संलेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र अपराधासाठी चालविण्यात आला आहे.

फिर्यादी यांच्या तक्रारीची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः–

०२. फिर्यादी यांचे मौजे पाली येथील बाजारपेठेमध्ये हितेश ज्वेलर्स नावाचे

सोने चांदीचे दुकान आहे व ते सोने चांदीचे अधिकृत विक्रेते आहेत. आरोपी यांचे पती संतोष गुजर यांच्या समवेत भिरा येथे राहतात व तेथे त्यांच्या पतीच्या मालकीचे हॉटेल व्यवसाय आहे. आरोपी व तिचे पती प्रस्तुतचा खटला दाखल करण्यापुर्वी ५ वर्षापासुन सोने चांदीचे दागिणे फिर्यादी यांच्या दुकानातुन खरेदी केली आहे. त्यामुळे फिर्यादी व आरोपी यांचा चांगला परिचय निर्माण होता.

०३. आरोपी हि तीच्या पती समवेत दि.२९.०५.२०१९ रोजी फिर्यादी यांच्या दुकानातुन सोने खरेदी करण्यासाठी गेली. आरोपीच्या पतीने त्या दिवशी त्यांच्या नावे सोनेचे गंठण खरेदी केले तर आरोपीने फिर्यादीच्या दुकानातुन तिच्या स्वत:च्या नावे ८० ग्रॅम ६०० मिली ग्रॅम सोन्याचे हार खरेदी केले. त्या दिवशी सोन्याचे भाव ३३००/- रुपये प्रती ग्रॅम मजुरीसह होता. आरोपीने फिर्यादीच्या दुकानातुन सोन्याचे हाराचे एकुण जी.एस.टी सह बिल रक्कम रुपये २,७३,९५०/- झाले होते. आरोपीने सदर दागिण्याच्या खरेदी पोटी फिर्यादीस त्यांचे आय.सी.आय.सी.आय बँक शाखा भिरा, पाटणूस येथील त्यांच्या खात्यातील दि.२९.०५.२०१९ रोजीचा धनादेश क्र.०००७६१ हा धनादेश फिर्यादीस दिला. सदरचा धनादेश आरोपीने सोन्याच्या हाराच्या खरेदीच्या किंमती अदा करण्याकामी दिला होता व फिर्यादीने नियमाप्रमाणे बिल आरोपीस दिला.

०४. फिर्यादीचे पुढे असे कथन की, त्यांनी सदरचा धनादेश बँक ऑफ इंडिया शाखा पाली येथे त्यांच्या खात्यामध्ये वटविण्यासाठी दि.२९.०५.२०१९ रोजी जमा केला असता आरोपीच्या खात्यावर *fund insufficient* असा शेरा मारुन बँक मेमो सह दि.०१.०७.२०१९ रोजी परत आले. त्यामुळे फिर्यादीने आरोपीस वकिलांमार्फत दि.२९.०७.२०१९ रोजी नोटीस पाठविली व धनादेशातील रक्कमेची मागणी केली. सदर नोटीस दि.०१.०८.२०१९ रोजी आरोपीस मिळाली. नोटीस प्राप्त होऊन देखील

आरोपीने रक्कम अदा केली नाही, म्हणुन फिर्यादीने प्रस्तुतची फिर्याद या न्यायालयात दाखल केली.

०५. या न्यायालयात फिर्याद दाखल केल्यानंतर प्राथमिक चौकशीनंतर आरोपी विरुध्द न्यायालयात आदेशिका जारी केली. समन्सची बजावनी झाल्यानंतर आरोपी न्यायालयात हजर झाले. त्यानंतर आरोपी विरुध्द निशाणी ३३ वर संपरिक्षा अभिलेख ठेवण्यात आला. सदर संपरिक्षा अभिलेखातील मजकुर आरोपीस त्यांचे मातृ भाषेत समजावुन सांगितले असता, त्यांनी त्यांच्या वरील आरोप नाकारला व खटला चालविण्याची मागणी केली. त्यानंतर फिर्यादी पक्षाचा पुरावा घेण्यात आला. फिर्यादी पक्षाच्या पुराव्यानंतर आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अनुसार जबाब निशाणी क्र.५२ वर नोंदविण्यात आले. आरोपीने त्यांच्या बचावात कोणतेही कायदेशीर देणे लागत नाही, फिर्यादीस कोणतेही धनोदश दिलेले नाही व त्यांच्या विरोधात खोटी केस दाखल केली असा बचाव घेतला.

०६. फिर्यादी व आरोपी यांचे परस्पर विरुध्द कथने व त्यांचे वकिलांचा युक्तीवाद विचारात घेता माझ्या समक्ष पुढील मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यांचे निष्कर्ष त्यांचे कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहेत.

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
०१.	फिर्यादीने परक्राम्य सल्लेख अधिनियम १९८१ चे कलम १३८ (अ ते क) मधील तरतुदी प्रमाणे खरेदी केल्याचे सिध्द केले आहे काय ?	**...होय...**
०२	फिर्यादीने वादातील धनादेश कायदेशीर देणे भागवणे करीता आरोपी त्यास दिला सिध्द केले आहे काय ?	**...होय...**

०३.	आरोपीने परक्राम्य सल्लेख अधिनियम १८८१ चेकलम १३८ नुसार शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केला आहे काय ?	**...होय...**
०४.	कोणता आदेश ?	**आरोपीला दोषी ठरविण्यात येते.**

.:: कारणमिमांसा ::

०७. आरोपी विरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी फिर्यादीने स्वत:ची साक्ष निशाणी क्र.९ वर नोदविली. त्यानंतर फिर्यादीने निशाणी क्र.४५ वरील पुरशिस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला. फिर्यादी पक्षाने पुराव्यामध्ये कागदपत्रे दाखल केलेले खालीलप्रमाणे

अ.क्र.	**कागदपत्रे**	**निशाणी क्रमांक**
०१	मुळ धनादेश क्र.००००७६१	**१३**
०२	धनादेश परत न वटता आल्याबाबतचा बँकेचा मेमोची मुळप्रत	**१४**
०३	आरोपीला पाठविलेली नोटीसीची मुळप्रत	**१५**
०४	पोष्टाची पावती	**१६**
०५	नोटीस पोचल्याची पोच पावती	**१७**
०६	धनादेश न वटता आलेले बँकेचे पत्र	**१८**
०८	सोने खरेदी केले बाबतची पावती	**१९**

०८. आरोपीने त्यांच्या बचावा करीता तोंडी व कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

<u>मुद्दे क्र.०१ :–</u>

०९. आरोपी विरुध्द परक्राम्य सल्लेख अधिनियम कलम १३८ प्रमाणे गुन्हा सिध्द होण्यासाठी फिर्यादीने खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. खरेदीदाराने बॅकेतील त्यांचा खात्यावरील धनादेश देणी भागविण्यासाठी दिला असल्याबाबत.

२. धनोदश दिल्याच्या तारेखेपासुन ६ महिन्याच्या आत पुन्हा धनादेशाच्या वैधतेची अदा रक्कम बॅकेमध्ये जमा केले असल्याबाबत.

३. धनादेश धारकाने सदर धनादेश न वटता परत आल्याची माहिती झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत धनादेशाची रक्कम मागणीची नोटीस दिली पाहिजे.

४. नोटीस देवूनही धनादेश देणारे १५ दिवसाच्या आत रक्कम

१०. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीचे यांचे पुराव्यात असे आले आहे की, प्रस्तुतचा खटला दाखल करण्यापुर्वी ५ वर्षापुर्वी पासुन आरोपी व त्यांचे पती सोन्याचे दागिणे खरेदी करण्यासाठी त्यांच्या दुकानात येत असे व त्यांच्या दुकानातुन खरेदी करीत असे. त्यामुळे फिर्यादीची व आरोपींची चांगली ओळख निर्माण झाली होती. दि.२९.०५.२०१९ रोजी आरोपी व तिचे पती सोने खरेदी करण्याच्या इरादयाने त्यांच्या दुकानात आले. आरोपीच्या पतीने त्याच दिवशी त्यांच्या नावाने फिर्यादीच्या दुकानातुन सोन्याचे गंठण खरेदी केले. आरोपीने देखील त्याच दिवशी फिर्यादींच्या दुकानातुन तिच्या स्वत:च्या नावे ८० ग्रॅम ६०० मिलीग्रॅम वजनाचा सोन्याचा हार खरेदी केला. त्या दिवशी सोन्याचे भाव प्रति ग्रॅम ३,३००/– रुपये मजुरीसह होता व त्या दागिणेची किंमत २,७३,९५०/– रुपये झाले होते. सदर दागिणेच्या किंमतीची रक्कम देणेकामी आरोपीने बिलाच्या रक्कमेच्या परतफेडी करीता रक्कम रुपये २,७३,९५०/–रुपयाचा

दि.२९.०५.२०१९ रोजीचा आय.सी.आय.सी.आय. बँक शाखा भिरा, पाटणूस खाते क्र.२२६६०१००००५० चा धनादेश फिर्यादीस दिला असे त्यानी सरतपासात नमुद केले.

११. फिर्यादी यांचे उलटतपासात प्रस्तुत घटनेच्या ५ वर्षाआधी पासुन फिर्यादीकडून सोन्याचे दागिणे घेऊन जात असे व त्याची किंमत नंतर अदा करीत असे हे त्यांनी मान्य केले व आरोपी त्यांना वेळोवेळी रक्कम आणुन देत असे हे त्यांनी मान्य केले. त्यांनी उधारीने दिलेला दागिणेचा लेखा जोखा असणारी नोंद वही या प्रकरणात दाखल केले नाही हे मान्य केले आहे. त्यांनी खरेदी पावतीवर आरोपीने आगाऊ रक्कम दिली नव्हती, त्यामुळे आगाऊ रक्कम लिहिण्याचा प्रश्न येत नव्हता असे नमुद केले. त्यांनी धनादेशावरील हस्ताक्षर त्यांचे असल्याचे मान्य केले. त्यांनी सोन्याचे दागिणे खरेदीची रक्कमेची मागणी आरोपीकडे ४–५ वेळेस केली होती असे मान्य केले व आरोपीने दि.२२.०१.२०२४ रोजी ५०,०००/– रुपये न्यायालयात जमा केले ते त्यांनी काढून घेतले हि बाब त्यांनी मान्य केली. त्यांनी दागिण्याची संपूर्ण रक्कम त्यांनी अदा केल्याचे त्यांनी नाकारले. आरोपी कोणतेही कायदेशीर देणे लागत नाही हि बाब त्यांनी नाकारली.

१२. फिर्यादी यांचे विधिज्ञांनी त्यांचे युक्तीवादात नमुद केले की, आरोपी यांनी फिर्यादी चे दुकानातून सोन्याचे दागिने खरेदी केले. परंतु रक्कम न देता त्यांनी धनादेश दिला व धनादेश अनादरीत झाला. त्यामुळे फिर्यादी यांनी कलम १३८ परक्राम्य संलेख अधिनियम गुन्हा सिध्द केला आहे. त्यामुळे त्यांनी आरोपीचे शिक्षेची मागणी केली

१३. आरोपी यांचे विधिज्ञांनी त्याचे युक्तीवादात धनादेश कायदेशीर देणी देणेसाठी दिला होता हि बाब नाकारली. त्यांनी धनादेशावरील अक्षर आरोपीचे नाही, आरोपीस इंग्रजी लिहिता वाचता येत नाही. धनादेश केवळ सुरक्षे करिता दिला होता व

त्या धनादेशाचा दुरूपयोग फिर्यादी यांनी केला. दागिने खरेदीचे रक्कम वेळोवेळी अदा केले आहे त्यामुळे त्यांनी आरोपीचे निर्दोष सुटकेची मागणी केली.

१४. प्रस्तुतचा खटला हा परक्राम्य संलेख अधिनियमांतर्गत असल्यामुळे फिर्यादी तर्फे अभिलेखावर मुळ धनादेश(नि.१३) दाखल केले आहे. सदरचा धनादेश हा आरोपीच्या खात्याचा नाही असे आरोपीचे कथन नाही अथवा धनादेश त्यांचा असल्याचे त्यांनी नाकारले नाही. आरोपीने धनादेशावरील सही नाकारली नाही. परंतु, धनादेशावरील मजकुर त्यांचा नसल्याचे त्यांनी बचाव घेतला व तो फिर्यादी त्यांच्या उलटतपासात मान्य केले. यावरुन वादातील धनादेश हा आरोपीने दिला होता हि बाब सिध्द होते.

१५. फिर्यादी यांच्या तोंडी पुराव्यामध्ये कथन केले की, वादातील धनादेश (नि.१३) हा त्यांनी त्यांचे खाते असलेल्या बॅक स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा पाली येथे दि.२९.०५.२०१९ रोजी वटविण्याकरीता जमा केला असता, आरोपीच्या खात्यावर अपुरी रक्कम *(fund insufficient)* असा शेरा मारुन दि.०१.०७.२०१९ रोजी न वटता फिर्यादीस परत आले. उलटतपासामध्ये आरोपी तर्फे सदरची बाब नाकारण्यात आली नाही. या व्यतिरिक्त बँकेचा मेमो (नि.१४) चे अवलोकन केले असता, वादातील धनादेश अपुरी रक्कम *(fund insufficient)* असा शेरा मारुन परत केल्याचे स्पष्ट निदर्शनास येते. परक्राम्य सल्लेख अधिनियम कलम १४६ अनुसार बॅकेचा मेमो व स्लीप हे बरोबर असल्याचे ग्रहितके प्राप्त होते. फिर्यादीचा तोंडी पुरावा व अभिलेखावरील कागदपत्रांच्या पुराव्यावरुन आरोपीने वादातील धनादेश बँकेचा मेमोमध्ये नमुद कारणामुळे परत आले नाही ही बाब खोडून काढता येत नाही. तसेच त्या करीता वेगळा वेगळा पुरावा दिलेला नाही. त्यामुळे वादातील धनादेश हा न वटता परत आला हि बाब फिर्यादीने त्यांच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याद्वारे सिध्द केले.

१६. फिर्यादीने त्यांच्या तोंडी पुराव्यामध्ये वादातील धनादेश दि.०१.०७.२०१९ रोजी न वटता परत आल्यामुळे त्यांनी दि.२९.०७.२०१९ रोजी आरोपीस रजिस्टर पोस्टाने धनादेशातील रक्कम मागणीची नोटीस पाठविली व आरोपीस ती नोटीस दि.०१.०८.२०१९ रोजी प्राप्त झाली आहे असे शपथेवर सांगितले आहे. फिर्यादीने त्यांच्या तोंडी पुराव्यामध्ये रक्कम मागणीची नोटीसीची स्थळ प्रत (नि.१५) वर, पोस्टाची पावती (नि.१६) वर व सदरची नोटीस आरोपीस प्राप्त झाल्याची पोहोच पावती (नि.क्र.१७) वर दाखल करुन सिध्द केले आहे. उलटतपासा दरम्यान आरोपी तर्फे त्यांना मागणी नोटीस नाही ही बाब विचारात आले नाही अथवा त्याबाबत कोणताही वाद प्रश्न उपस्थित केले नाही. या व्यतिरिक्त पाठविलेली नोटीस चुकीच्या पत्यावर पाठविली असा आरोपीचा बचाव नाही. मागणी नोटीस अचुक पत्यावर पाठविले असल्यास कलम २७ जनरल क्लॉजेस ॲक्ट अनुसार नोटीस प्राप्त झाल्याचे ग्रहितके आहेत. सदरचे ग्रहितके आरोपीने पुरावा देवुन खोडून काढलेला नाही.

१७. एकंदरीत उपरोक्त विवेचनाच्या आधारे असे निदर्शनास येते की, आरोपीने फिर्यादीस वादातील धनादेश दि.२९.०५.२०१९ रोजी दिला व तो धनादेश दि.०१.०७.२०१९ रोजी न वटता परत आला. त्यानंतर फिर्यादीने आरोपीस दि.२९.०७.२०१९ रोजी धनादेशातील रक्कमेचा मागणीची नोटीस पाठविली. सदरची नोटीस आरोपीस प्राप्त झाली ही बाब फिर्यादीने सिध्द केले आहे.

१८. उपरोक्त विवेचनाच्या आधारे असे निदर्शनास येते की, दि.२९.०५.२०१९ रोजी आरोपी यांनी फिर्यादीस नि.क्र.१३ वरील धनादेश दिला. फिर्यादी यांनी सदरचा धनादेश त्याच दिवशी बँकेत जमा केला असता, सदरचा धनादेश दि.२७.०६.२०१९ रोजीचा बँक मेमो (नि.क्र.१४) दि.०१.०७.२०१९ रोजी परत आला असे नमुद केले असल्याचे दिसून येते. परंतु, बँक मेमो वरील तारीख दि.

२७.०६.२०१९ असल्याचे दिसून येते. फिर्यादी यांनी बँक मेमो दि. ०१.०७.२०१९ रोजी मिळाल्या बाबत कोणताही पुरावा दाखल केला नाही.

१९. मा.उच्च न्यायालय यांनी ***अजय गुप्ता वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र २००४ क्री.लॉ.ज. ३६४८*** या न्याय निवाडयामध्ये कलम १३८ या बाबत नेमुन दिलेली कालमर्यादा हि बँकेत धनादेश जमा करणा–या व्यक्तीला बँकेकडुन मिळालेली माहिती ज्या दिवसा पासुन मिळते, प्राप्त होते त्या दिवसापासुन कालमर्यादा मोजावी असे नमुद केले आहे.

२०. प्रस्तुतच्या खटल्यामध्ये बँक मेमो दि.२७.०६.२०१९ रोजीचा असल्याचे (नि.क्र.१४) वरील बँक मेमोचे आधारे दिसून येते. फिर्यादी यांनी त्यांचे फिर्याद व शपथपत्रात त्यांना दि.०१.०७.२०१९ रोजी बॅक मेमो मिळाल्याचे नमुद केले. फिर्यादी यांनी दि.२९.०७.२०१९ रोजी नोटीस पाठविले. आरोपी यांनी फिर्यादींना त्यांच्या उलटतपासा दरम्यान याबाबत काही सुचविले नाही अथवा कोणताही प्रश्न विचारण्यात आला नाही. बँक मेमो फिर्यादीला प्राप्त झालेल्या तारखे बाबत त्यांनी कोणताही वाद उपस्थित केला नाही. बँकमेमो वरील तारीख व फिर्यादी यांनी फिर्यादीत, शपथपत्रत नमुद केलेल्या तारीख ही बाब अविवादीत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे फिर्यादी यांनी त्यांच्या बँकेकडून दि.०१.०७.२०१९ रोजी बँक मेमो प्राप्त झाला ही बाब अविवादीत राहते.

२१. त्यामुळे फिर्यादीने परक्राम्य सल्लेख अधिनियम कलम १३८ मधील आवश्यक बाबींची पुर्तता केली आहे हे सिध्द झाले आहे. त्यामुळे मुद्या क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

मुद्या क्र.२:–

२२. मुद्या क्र. १ चे विवेचना वरुन वादातील धनादेश हा आरोपीच्या बँक

खात्यातील असुन तो न वटता परत आला. त्यानंतर फिर्यादीने आरोपीस धनादेशातील रक्कम मागणीची नोटीस दिली. ती नोटीस आरोपी प्राप्त झाल्यानंतर आरोपीने रक्कम दिली नाही असे सिध्द झाले आहे. मात्र परक्राम्य सल्लेख अधिनियम कलम १३८ अनुसार गुन्हा सिध्द होण्यासाठी फक्त धनादेश न वटता परत आला ऐवढे पुरेसे नाही. त्यासाठी धनादेश हा कायदेशीर देणे भागविण्यासाठी दिला होता हे सिध्द होणे आवश्यक व गरजेचे आहे.

२३. फिर्यादीने त्यांच्या तोंडी पुराव्यामध्ये आरोपीने त्यांच्या हितेश ज्वलेर्स या त्यांच्या सोने चांदीच्या विक्रीच्या दुकानातुन दि.२९.०५.२०१९ रोजी ८० ग्रॅम ६०० मिली ग्रॅम वजनाच्या सोन्याचे हार प्रति ग्रॅम ३,३००/- किंमत असताना खरेदी केले व सदर खरेदीच्या रक्कमेचे बिल आरोपीने फिर्यादींना दिले असता सदर बिलाचा रक्कम अदा करण्याकामी आरोपीने त्यांचे खाते असलेल्या आय.सी.आय.सी.आय बँक शाखा भिरा पाटणूस या बँकेतील त्यांचे खाते क्र.२२६६०१०००००५० या खात्यातील धनादेश क्र.०००७६१ चा धनादेश रक्कम रुपये २,७३,९५०/- दि.२९.०५.२०१९ रोजीचा दिला असे शपथेवर सांगितले आहे. आरोपी तर्फे करण्यात आलेल्या उलटतपासामध्ये फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये दागिण्यांच्या खरेदी विक्रीचा व्यवहार झाला ही बाब नाकारलेली नाही.

२४. फिर्यादी यांच्या विधिज्ञांनी युक्तीवादात नमुद केले की, सदरचा व्यवहार हा खरेदी विक्रीचा असल्यामुळे व विक्रीची किंमत देणेकामी आरोपी यांनी धनादेश दिला असल्याकारणामुळे सदरचा धनादेश हा कायदेशीर खरेदीची रक्कम अदा करण्याकामी कायदेशीर देणी देणेकरीता दिला होता हे निदर्शनास येते व आरोपीने कायदेशीर देणी देणेकरीता धनादेश दिला नव्हता हि बाब खोडून काढण्याची जबाबदारी आरोपींची होती असे नमुद करुन आरोपीने कोणताही स्वतंत्र तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दाखल

केलेला नाही. तसेच त्यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये नमुद केले की, खरेदी विक्रीच्या व्यवहारातील खरेदीची रक्कम फिर्यादीस धनादेश देऊन रक्कम देण्याची जबाबदारी स्वीकारली होती. त्यामुळे परक्राम्य सल्लेख अधिनियम कलम १३८ लागु होतो असा युक्तीवाद फिर्यादी यांच्या विधिज्ञांनी केला. आरोपी यांचे विधिज्ञांनी धनादेशावरील हस्ताक्षर आरोपीचे नाही, धनादेश सुरक्षेकरीता देण्यात आला होता असा युक्तीवाद केले.

२५. फिर्यादी यांच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता, ५ वर्षा पेक्षा अधिक काळापुर्वी पासुन आरोपी फिर्यादी यांच्या दुकानातुन दागिणे घेऊन जात असे व त्याची किंमत नंतर अदा करीत असे व त्या वस्तुच्या किंमतीची रक्कम वेळोवेळी आणून देत असे हि बाब फिर्यादी यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केली. आरोपी यांच्या विधिज्ञांनी त्यांच्य युक्तीवादामध्ये नमुद केले की, वेळोवेळी दागिण्यांच्या किंमती फिर्यादी यांना दिलेली आहे. त्यांच्या युक्तीवादास पुष्टी देणारा प्रश्न प्रस्तुत व्यवहाराची किंमत वेळोवेळी फिर्यादीना आरोपीने दिली होती असे फिर्यादीने मान्य केले नाही. त्यामुळे सदरची बाब कोणत्याही पुराव्या विना पटलावर प्राप्त झाली नाही व प्रस्तुत खटल्यातील खरेदीपुर्वी आरोपीने वेळोवेळी रक्कमा दिल्या. या खटल्यातील व्यवहाराच्या खरेदीची रक्कम देखील आरोपीने वेळोवेळी दिली असा अनुमान काढता येणार नाही.

२६. फिर्यादी यांनी उधारी रक्कमेचा लेखाजोखा दर्शविणारी नोंदवही पटलावर दाखल केली नाही. याबाबी मुळे आरोपी यांच्याकडे कोणतीही रक्कम शिल्लक नाही असा अनुमान देखील काढता येणार नाही. त्याच प्रकारे खरेदी विक्रीच्या व्यवहारातील जी.एस.टी. च्या रक्कमेचा लेखा जोखा पटलावर दाखल केला नाही. त्यामुळे देखील व्यवहार झाला नाही, अथवा त्या व्यवहाराची रक्कम आरोपीने फिर्यादीस दिली असा अनुमान काढता येणार नाही.

२७. आरोपी यांच्या विधिज्ञांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये फिर्यादी यांनी दिलेल्या

पावतीवर आरोपींची सही नाही असा युक्तीवाद केला. परंतु, आरोपी यांनी त्यांच्या व फिर्यादी यांच्यातील दागिणे खरेदीचा व्यवहार नाकारलेला नाही. केवळ त्याचा बचाव वेळोवेळी सदरच्या रक्कमा फिर्यादी यांना दिल्या. फिर्यादी यांनी खरेदीची पावती पटलावर दाखल केली. त्याआधारे फिर्यादी यांनी खरेदीचा व्यवहार सिध्द केला. त्यामुळे केवळ खरेदी करणारी व्यक्ती आरोपीची सही नाही हि बाब आरोपीस कोणताही फायदा पोहचवित नाही.

२८. संपूर्ण पुराव्याचे अवलोकन केले असता,असे निदर्शनास येते की, आरोपी यांनी सदरचा व्यवहार नाकारलेला नाही. या उलट खटल्याच्या प्रलंबितते दरम्यान त्यांनी आरोपी यांनी न्यायालयात ५०,०००/– रुपये रक्कम जमा केल्याचे निदर्शनास येते. या आधारे आरोपी खरेदी विक्रीचा व्यवहार मान्य करीत असल्याचे निदर्शनास येते. तसेच आरोपी यांनी वादातीत धनादेश दिला असल्याचे मान्य असल्याचे निदर्शनास येते.

२९. वादातीत धनादेशातील हस्ताक्षर फिर्यादी यांनी त्यांचे असल्याचे उलटतपासात मान्य केले. या बाबीस आरोपी यांच्या विधिज्ञांनी त्यांचा युक्तीवाद केला की, त्यावरील हस्ताक्षर आरोपीचे नाही. ***मा. सर्वोच्च न्यायालय यांनी बीर सिंग विरुद्ध मुकेश कुमार (२०१९) ४ एस.सी.सी. १९७***

या न्याय निवाडयामध्ये सही करुन स्वच्छेने दिलेला धनादेश आणि त्या धनादेशातील मजकुर धनादेश स्वीकारणा–या व्यक्तीने लिहिला असल्यास सदरचा धनादेश बेकायदेशीर ठरत नाही असे नमुद केले. तसेच मा. सर्वोच्च न्यायालया यांनी ***मा. सर्वोच्च न्यायालय यांचे ओरियंटल बँक ऑफ कॉमर्स वि. प्रबोध कुमार तेवारी (२०२२) ५ एस.सी.सी. ४२*** या न्याय निवाडयामध्ये धनादेशावरील मजकुर इतर कोणत्याही व्यक्तीने भरल्यास व त्यावरील सही मात्र धनादेश देणा–या व्यक्तीचे असल्यास सदरचा धनादेश बेकायदेशीर ठरत नाही. त्यामळे प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीने वादातीत धनादेश

दिल्याचे मान्य केले आहे, त्यावरील सही मान्य केली आहे, परंतु, केवळ मजकुर नाकारलेला आहे. आरोपीने धनादेश खरेदीपोटी दिला ही बाब सिध्द होत असल्यामुळे व त्या धनादेशावरील सही त्यांची असल्याचे मान्य केल्यामुळे त्यास परक्राम्य सल्लेख अधिनियम कलम ११८ व १३९ चे गृहितके लागू होतात व सदरचे गृहितके आरोपीने योग्य तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा देवून खोडलेला नाही.

३०. आरोपी व फिर्यादी यांच्या दरम्यान प्रस्तुत खटल्यातील व्यवहार आधी विविध खरेदी विक्रीच्या व्यवहार झालेला आहे व त्यांचे हे व्यवहार घडण्याच्या ५ वर्षाआधी पासुन झालेली असल्याचे निदर्शनास येते व आरोपी फिर्यादी यांच्या दुकानातुन सोने विकत घेऊन जात असे व त्यानंतर त्यांची किंमत आणुन देत असे हि बाब फिर्यादी यांनी त्यांच्या उलटतपासा दरम्यान मान्य केले. त्या आधारे आरोपी यांनी प्रस्तुत दागिण्याच्या खरेदी करीता दिलेली रक्कम आणुन दिली होते असा बचाव असल्याचे निदर्शनास येते. परंतु, सदरची रक्कम कधी दिली, केव्हा दिले या बाबत कोणताही पुरावा पटलावर दाखल केला नाही.

३१. उलटतपासा दरम्यान प्रस्तुत खटल्यातील धनादेश हे दागिणे खरेदी करण्याच्या व्यवहाराच्या सुरक्षिते पोटी दिला होता व आरोपीने दागिणेची संपुर्ण रक्कम दिली होती असे फिर्यादीस उलटतपासा दरम्यान सुचविण्यात आले. त्यामुळे आरोपी यांनी दागिणेची संपुर्ण रक्कम दिली होती असा बचाव असल्याचे निदर्शनास येते. या बाबींचा अनुमान काढला असता असे निदर्शनास येते की, फिर्यादी यांनी प्रस्तुत खटल्यात नमुद केलेली बाब की आरोपी यांनी त्यांच्या दुकानातुन ८० ग्रॅम ६०० मिली ग्रॅम वजणाच्या सोनेचे हार खरेदी केले होते व त्यांची किंमत २,७३,९५०/- किंमत होती हि बाब आरोपी यांनी नाकारलेली नाही. आरोपी यांनी त्यांच्या दुकानातुन दागिणे खरेदी केले होते हि बाब मान्य केले व आरोपी यांनी फिर्यादी यांना धनादेश दिला होता

हि बाब त्यांनी त्यांच्या उलटतपासाद्वारे मान्य केले. परंतु, सदरचा धनादेश हा केवळ दागिण्याच्या घटनेच्या सुरक्षितते पोटी दिला होता असा बचाव घेतल्याचे निदर्शनास येते. म्हणजेच आरोपी यांनी धनोदशावरील त्यांची स्वाक्षरी नाकारली नाही. धनादेश दिल्याचे देखील नाकारले नाही. त्यामुळे पराक्रम्य सल्लेख अधिनियम कायद्यातील कलम ११८ व १३९ अन्वये असलेले गृहितके प्राप्त होतात व त्या आधारे कायदेशीर खरेदीची रक्कम परत करणे करीता प्रस्तुतचा धनादेश दिला होता हि बाब फिर्यादी यांच्या पुराव्याद्वारे सिध्द करीत असल्याचे निदर्शनास येते.

३२. सदरचा धनादेश कायदेशीर देणी देणे करीता दिला नव्हता हि बाब सिध्द करण्याची जबाबदारी आरोपीवर होती. परंतु, त्याबाबत त्यांनी सदरचा धनादेश हा रक्कमेच्या सुरक्षितते पोटी दिला होता असा बचाव घेतला व दागिणे खरेदीची संपुर्ण रक्कमे पैकी काही रक्कम दिली होती, वेळोवळी दिली होती असा बचाव घेतला. परंतु, आरोपी यांनी प्रस्तुत खटल्यातील विविध घटना, अथवा कागदोपत्री पुरावा, अथवा त्यांच्या स्वतःचा पुरावा, साक्षीदारांचा पुरावा दाखल करुन त्या आधारे त्यांनी सदरच्या बाबी पटलावर आणल्या नाहीत. फिर्यादी यांनी दाखल केलेल्या पुराव्यावर तसेच पराक्रम्य सल्लेख अधिनियम कायद्यातील कलम ११८ व १३९ चे गृहितके खोडून काढले जातील अशा (preponderence of probability) शक्यतेच्या व प्राबल्यतेच्या आधारे संशय निर्माण होईल असा पुरावा दाखल केला नाही. खटल्याच्या प्रलंबितते दरम्यान आरोपीने फिर्यादींना ५०,०००/- अदा केले हि बाब फिर्यादीचे विधीज्ञांनी त्यांचे युक्तीवादात मान्य केले व सदरची बाब कायदेशीर देणे देणी साठी होते या बाबी करीता विचारात घ्यावे लागते. त्यामुळे फिर्यादी यांनी प्रस्तुत खटल्यातील धनादेश हा कायदेशीर देणी देणेकरीता (legal liability) दिला होता हि बाब सिध्द होते.

३३. त्यामुळे फिर्यादी पराक्रम्य सल्लेख अधिनियम १३८ मधील व त्या

करीताचे अटी पुर्ण करीत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे मुद्या क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.

मुद्दा क्र. ३ :

३४. प्रस्तुत प्रकरणात मुद्या क्र.१ व २ चे विश्लेषण व विवेचनाच्या आधारे आरोपीने वादातीत धनादेश हा दि.२९.०५.२०१९ रोजी बेकायदेशीर देणे भागविण्यासाठी फिर्यादीस दिला व सदरचा धनादेश वटविण्यासाठी दि.२९.०५.२०१९ रोजी बँक ऑफ इंडिया शाखा पाली येथे जमा केले व ते धनादेश न वटता बँक मेमो निशाणी क्र.१४ सह कागदावर पुरेशी रक्कम शिल्लक नाही या कारणासह दि.०१.०७.२०१९ रोजी परत आला. त्यानंतर आरोपीने विहित मुद्दतीत दि.२९.०७.२०१९ रोजी धनादेश रक्कम मागणी नोटीस दिली. सदरची नोटीस आरोपीस दि.०१.०८.२०१९ रोजी प्राप्त झाली, नोटीस मिळून ही आरोपीने धनादेश रक्कम दिली नाही. त्यानंतर विहित मुद्दतीत फिर्यादीने दि.१०.०९.२०१९ रोजी फिर्यादी न्यायालयात दाखल केली. हे सर्व संशया पलिकडे जावुन फिर्यादीने सिध्द केले आहे. त्यामुळे आरोपीने परक्राम्य सलेख अधिनियमाचे कलम १३८ अनुसार गुन्हा केल्याचे सिध्द होते. त्यामुळे मुद्या क्र.३ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.

<u>मुद्दा क्र.४ करीता:–</u>

३५. मुद्दा क्र.०१ ते ३ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदविण्यात आलेले आहेत. अशा परिस्थितीत मुद्दा क्र. ०४ करीता आरोपीस परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ अन्वये दोषी असल्याचे धरण्यात येते. त्यामुळे आरोपीचे शिक्षे वर म्हणणे ऐकणे महत्वाचे ठरते.

३६. फिर्यादी अथवा फिर्यादींचे विधिज्ञ यांना पुकारले असता गैरहजर. त्यांचे गैरहजरी मुळे केवळ आरोपीचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात येते.

३७. आरोपी यांच्या विधिज्ञांनी आरोपीचा हा प्रथम गुन्हा असुन आरोपी त्यांच्या कुटुंब वत्सल स्त्री आहे. तिचे आधारावर संपूर्ण कुटूंब आहे. आरोपी विविध आजाराने त्रस्त आहे. आरोपीस सहानभुती दाखवून शिक्षा ठोठावण्या ऐवजी कमीत कमी दंड ठोठावण्याची विनंती केले

३८. परक्राम्य सलेख अधिनियम १८८१ चे १३८ नुसार २ वर्षे अथवा धनादेशाच्या दुप्पट शिक्षेची तरतुद केलेली आहे. परक्राम्य संलेख अधिनियमातील कलम १३८ मधील तरतुद केलेल्या शिक्षेचे अवलोकन केले. ***मा.सर्वोच्च न्यायलय यांनी आर.विजयन वि. बेबी आणि इतर ऐ.आय.आर. २०१२ एस.सी. ५२८*** या निवाडयामध्ये परक्राम्य सलेख अधिनियमातील Chapter XVII मध्ये झालेल्या नुकसानाची भरपाई याकडे झुकलेला असल्याचे नमुद केले व त्यामध्ये धनादेशाच्या दुप्पटी इतक्या रक्कमेचा दंड व त्यावर व्याज देण्यात यावे असे आदेशीत केले आहे व ती रक्कम नुकसान भरपाईच्या स्वरुपात फिर्यादीला देण्यात यावे असे सुचविण्यात आले आहे.

३९. प्रस्तत खटल्यात आरोपी महिला आहे. तिचे वर तिचे कुटूंब अवलंबून आहे. अशा परिस्थीतीत महिलेस तुरुंगवासाची शिक्षा दिल्यास संपूर्ण कुटूंबावर परिणाम होवू शकते. त्यामुळे आरोपीस धनादेशाचे दुप्पट रक्कम दंड रुपये ठोठावणे न्यायोचीत ठरते. आरोपी यांनी खटल्याचे प्रलंबितते दरम्यान ५०,०००/- रुपये भरले असल्याचे दिसून येते. त्यामुळे धनादेशाचे एकूण २,७३,९५०/- रुपयांपैकी केवळ २,२३,९५०/- रुपये येणे बाकी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आरोपीस २,२३,९५०/- रुपयाचे दुप्पट रक्कम दंड ठोठावणे न्यायोचीत ठरते. अशा परिस्थीतीत २,२३,९५०/- रुपयाची दुप्पट रक्कम ४,४७,९००/-

४०. त्यामुळे मुद्दा क्र.४ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

:: आदेश ::

०१. आरोपी **रिना संतोष गुजर** यांना परक्राम्य संलेख अधिनियमाचे कलम १३८ अन्वये शिक्षेसपात्र असलेलया गुन्हयाच्या अपराधा मध्ये फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(२) अन्वये दोषी धरण्यात आले आहे.

०२. आरोपीस परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वये रक्कम रुपये ४,४७,९००/– दंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपीने दंडाची रक्कम भरणा करण्यास कसूर केल्यास १ महिने साध्या कारावासायची शिक्षा भोगावी.

०३ आरोपीने दंडाची रक्कम जमा केल्यानंतर दंडाची संपूर्ण रक्कम फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३५७(१) अनुसार फिर्यादी यांना देण्यात यावे.

०४ आरोपीस न्यायनिर्णयाची प्रत विनामुल्य तात्काळ देण्यात यावी.

०५ आरोपी यांचा जामीन कदबा रद्द करण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

Sd/–

ठिकाणः पाली. **(रा.अ.शिवरात्री)**

दिनाकः २१/०७/२०२६ **न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, पाली**

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

(a)	Name of the Stenographer	Ankush S. Waghmare
(b)	Court Name	CJJD & JMFC, Pali
(c)	Judgment signed by P.O.on	21.07.2026
(d)	Judgment uploaded on	21.07.2026